महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे–४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

महत्वाचे/परीक्षा प्राधान्याने

क्रमांक:पुविमं/माध्य/गोपनीय–ड/734
पुणे – ४११००५
दिनांक: १२ डिसेंबर, २०२३

प्रति,

मुख्याध्यापक,
पुणे, अहमदनगर व सोलापूर जिल्हयातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक विद्यालये

**विषय – माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च– २०२४ करीता परीक्षक/नियामक पॅनल अद्ययावत करण्यासाठी इ. १० वी ला शिकविणाऱ्या शिक्षकांची माहिती सादर करणेबाबत**

**संदर्भ –** १. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक पुविमं/माध्य/गोपनीय–ड/५७०६ दि.२०/०९/२०२३
२. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक पुविमं/माध्य/गोपनीय–ड/६६७६ दि.०८/११/२०२३
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक पुविमं/माध्य/गोपनीय–ड/६८९२ दि.२२/११/२०२३

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, मार्च–२०२४ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेच्या उत्तरपत्रिका मूल्यांकन करणेकरीता परीक्षक/नियामक नियुक्तीसाठी इ. १० वी ला शिकविणाऱ्या शिक्षकांची माहिती अद्ययावत करण्याचे काम सद्ध्या या कार्यालयाकडून सुरु आहे.

यासाठी उपरोक्तप्रमाणे दोन परिपत्रके व एक अंतिम स्मरणपत्रान्वये आपल्या माध्यमिक शाळेतील इ. १० वी ला शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांची माहिती मंडळास दि. २८ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत हस्तपोहोच सादर करणेकरीता कळविण्यात आले होते.

परंतु अद्याप बहुतांश माध्यमिक विद्यालयांनी सदर शिक्षक माहिती मंडळ कार्यालयास सादर केलेली नाही. सदर बाब गंभीर असून परीक्षार्थ्यांच्या गुणवत्तापूर्वक मूल्यांकनाचे कामकाजावर परिणाम करणारी आहे.

या कार्यालयाचे कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक विद्यालयांनी इ. १० वी ला शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांची माहिती मंडळाकडे पाठविली तर उपलब्ध सर्व शिक्षकांना उत्तरपत्रिका मूल्यांकनाचे काम दिल्यास परीक्षक व नियामकांवरील उत्तरपत्रिका तपासणीचा भार कमी करता येईल, पर्यायाने उत्तरपत्रिका मूल्यांकन गुणवत्तापूर्ण होईल अशी मंडळाची खात्री आहे.

विभागीय मंडळाकडून वेळोवेळी देण्यात आलेले निर्देशाचे पालन करुन देण्यात आलेल्या आदेशाची अंमलबजावणी करुन मंडळास सहकार्य करणे सर्व माध्यमिक विद्यालयांकडून अपेक्षित आहे. संदर्भाधीन क्र. ३ अन्वये निर्धारित केलेली मुदत संपुष्टात आली आहे. दि. १३/१२/२०२३ रोजी मंडळ प्रतिनिधी प्री–लीस्ट स्विकारण्यासाठी संकलन केंद्रावर येणार आहेत. दि. १३/१२/२०२३ ही अंतिम मुदत आहे. तरी शिक्षकांची माहिती समक्ष न चुकता जमा करावी.

सदर निर्धारीत मुदतीत इ. १० वी ला शिकविणाऱ्या माध्यमिक शिक्षकांची माहिती सादर न करणाऱ्या माध्यमिक विद्यालयांना सुनावणीसाठी मंडळ कार्यालयात पाचारण करण्यात येणार आहे, याची नोंद घेण्यात यावी.

(औदुंबर स. उकिरडे)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे – ४११००५

प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव –

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
२. शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर
सदर पत्रात देण्यात आलेल्या निर्देशाची काटेकोरपणे अंमलबजावणी होणेसाठी व आपल्या जिल्हयातील सर्व माध्यमिक विद्यालयातील इ. १० वी ला शिकविणाऱ्या माध्यमिक शिक्षकांची माहिती मंडळास सादर होईल, याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.